|| श्री गणेशाय नमः ||

Astro • Puja • Vastu

# हरी ॐ धार्मिक पूजा विधी केंद्र

## ज्योतिष आणि वास्तु सल्लागार

योगेशशास्त्री ढवळे (गुरुजी)
Mob. 95944 28749

निलेशशास्त्री ढवळे (गुरुजी)
Mob. 86524 02078

# श्री हरितालिका व्रत आणि पूजा



तुकाराम बुक डेपो, मुंबई-४.

सर्वश्रेष्ठ परम मंगल सौभाग्यव्रत

# श्री हरितालिका

## व्रत आणि पूजा


लेखन-संपादन

**अलंकार भारती**

भक्तकवी 'मिलिन्द माधव' यांचे शिष्य



For Hariom Astrologers

Proprietor


**किंमत २५ रूपये**


तुकाराम बुक डेपो, मुंबई ४०० ००४

# आशीर्वाद

श्री हरितालिका हे व्रत पार्वतीचे आहे. पार्वती ही शिवाची शक्ती आहे. ज्ञानेश्वर महाराज या शिवशक्ती देवोदेवीचे स्वरूप व कार्य सांगताना म्हणतात -

**ऐसी ही निरुपाधिके। जगाची जिये जनके।**
**जिथे वंदिली तिया मूळिकें। देवोदेवी॥**

उपनिषदात याच शक्तीला 'देवी', 'शिवा' म्हटले आहे. शिव आणि शक्ती यांची एकच सत्ता आहे. ज्ञानेश्वर महाराज त्यावर म्हणतात -

**जया एक सत्तेचे बैसणे। दोघे एक प्रकाशाचे लेणे।**
**जे अनादि एकपणे। नांदती दोघे॥**

पार्वती ही आनंदस्वरूप विश्वजननी आहे. सनातन परब्रह्म आहे. वेदवाङ्मयात 'गौरी' म्हणून तिचा महिमा वर्णिला आहे. प्राचीन कालापासून तिची पूजा व उपासना चालूच आहे. त्या काळी पूजा सांगण्यासाठी ब्राह्मण गुरुजी मिळत होते. आजच्या काळात ते सहसा मिळत नाहीत. म्हणूनच सुवासिनींनी हे व्रत यथाविधी करावे, श्री हरितालिका पूजा यथासांग करावी यासाठी हे पुस्तक तयार केले. या पुस्तकाप्रमाणे सशास्त्र व यथाक्रम उपचार समर्पण करून पूजन केल्यास त्यांना आनंद व समाधान लाभेल असा मला विश्वास वाटतो. त्यांना माझे आशीर्वाद.

'तुकाराम बुक डेपो'चे श्री. मधुकर शिवराम कस्तूर यांनी 'तुकाराम बुक डेपो'च्या शतकमहोत्सवी वर्षात माझे हे पुस्तक प्रसिद्ध केले याचे मला मोठे भूषण वाटते. मी त्यांचे आभार मानतो. सुयश चिंतितो.

राजावाडी, मुंबई ७७

- अलंकार भारती

© प्रकाशकाधीन • नवीन आवृत्ती
प्रकाशक : महेंद्र मधुकर कस्तुर
तुकाराम बुक डेपो, माधवबाग, सी.पी. टँक, मुंबई ४०० ००४.
अक्षरजुळणी : अक्षय फोटोटाइपसेटर्स, डॉ. आंबेडकर मार्ग, ठाणे (प) - ४०० ६०१.
मुद्रक : शिवानी प्रिंटर्स, खाडिलकर मार्ग, गिरगाव, मुंबई ४०० ००४.



# श्री हरितालिका व्रत

हिंदू संस्कृतीत माताभगिनींच्या सुखकल्याणासाठी त्यांना करावयाची अनेक परममंगल व्रते आहेत. त्या सर्व व्रतांमध्ये 'श्री हरितालिका व्रत' हे सर्वश्रेष्ठ आणि मंगल व्रत आहे.

हे व्रत केल्याने श्री उमामहेश्वराचा कृपाप्रसाद प्राप्त होऊन जीवनात आनंद, सुखसमाधान लाभते. जीवन ऐश्वर्य, वैभवाने समृद्ध बनते. घरकुटुंबाचे सर्वतोपरी कल्याण होते.

हे व्रत हजारो वर्षे माताभगिनी मोठ्या प्रेमाने, भक्तिभावाने करीत आहेत.

स्त्रीजातीला सौभाग्याइतके मंगलत्व दुसरे कशातही आढळत नाही. सौभाग्य हेच स्त्रीचे सर्वस्व असते. हे सौभाग्य पतीपासून प्राप्त होते म्हणून हरितालिकेची पूजा माताभगिनी मनोभावे, श्रद्धेने करून आपल्या पतीला दीर्घायुष्य व उत्तम आरोग्य लाभावे, आपले सौभाग्य अखंड राखावे अशी प्रार्थना करतात. आपल्या सासरमाहेर या दोन्ही कुळांचे मंगल व्हावे अशीदेखील देवीकडे त्या आराधना करतात. असे हे पतिव्रतांचे अत्यंत आवडते व्रत आहे.

सौभाग्यप्राप्ती, सौभाग्यवृद्धी, सुखसमृद्धी आणि ऐश्वर्य-वैभव-श्रीमंती यावी यासाठी भाद्रपद शु.॥ तृतीयेला हे श्री हरितालिका व्रत करावे.

चतुर्थीच्या शुभदिनी हरितालिका येते. चतुर्थीसहित तृतीया हरितालिका शुभ फल देणारी असते.

**चतुर्थीसहिता या तु सा तृतीया फलप्रदा।**
**अवैधव्यकरी स्त्रीणां पुत्र पौत्र प्रवर्धिनी॥**

असे आपस्तम्ब ऋषीने म्हटले आहे.

हे व्रत केल्याने शिवपार्वतीचा कृपाप्रसाद लाभून, इच्छित फलप्राप्ती होते. सर्व कामना पूर्ण होऊन सुखानंदात राहण्यासाठी हरितालिका व्रत करण्याचे पार्वतीने माताभगिनींना सुचविले आहे. शंकराने हे व्रत सर्व व्रतांत श्रेष्ठ असल्याचे म्हटले आहे.

❋ ❋ ❋

# श्री हरितालका व्रत कथा

श्री हरितालिका व्रताच्या देवता शिव व पार्वती आहेत. पार्वती ही शिवाची अर्धांगी. महान पतिव्रता. स्त्रीजातीचा आदर्श. जन्मोजन्मी हाच पती मिळावा म्हणून पार्वतीने उग्र तप केले. व्रत केले. तेच श्री हरितालिका हे व्रत.

पूर्वजन्मी पार्वतीने शिवशंकरास वरले. पार्वतीचा पिता दक्षराज याला ही गोष्ट आवडली नाही.

दक्ष प्रजापती याने महायज्ञ-याग-सत्रास आरंभ केला. सर्व देवांना आमंत्रणे दिली, परंतु शिवपार्वतीला मात्र त्याने बोलाविले नाही.

ब्रह्मा, विष्णू ज्याला वंदन करतात, वेद आणि शेष ज्याचे स्तवन करतात, अशा शिवजगदात्म्याचा शिवमहिमा जाणून न घेता दक्षराजा रात्रंदिवस शिवाची निंदा करीत असे. शिवाला तो देव मानत नसे.



आपल्या पित्याने महा-यज्ञयाग-सत्र समारंभ आरंभिला असून सर्वांना आमंत्रणे केली; पण आपल्या पतीला व आपणाला बोलाविले नाही म्हणून पार्वतीला अतिशय दुःख झाले.

आपला पिता कदाचित आम्हांला विसरला असेल, आमंत्रण येईल अशा आशेने दक्षकन्या पार्वती आतुरतेने कैलासात वाट पाहत होती.

नंतर पार्वती शिवशंकरांना म्हणाली, 'हे प्राणनाथा, माझ्या पित्याने आपल्या सदनी यज्ञयाग मांडिला आहे. त्याने आपल्या सर्व कन्यांना सन्मानाने आमंत्रित केले आहे. मला आमंत्रण देण्यास तो कदाचित विसरला असेल. मला तिथे जायलाच हवे!'

पार्वतीचे हे उद्धार ऐकून शिव म्हणाले, 'हे मृगलोचने गौरी तू मुळीच तिथे जाऊ नकोस. तुझा पिता माझा द्वेष करतो. हे शुभानने, तू तेथे गेलीस तर तुझा पिता तुला अपमानित करील!'

शिव अंबिकेला हे सांगत असताना देवर्षी नारदमुनी तिथे आले. नारदाने त्यांचा संवाद ऐकला होता. ते पार्वतीला म्हणाले, 'देवी, पित्याच्या घरी जाण्यासाठी कन्येने मानपान पाहू नये!'

नारदाचे हे वचन ऐकून पार्वतीने दक्षराजाच्या त्या समारंभास जाण्याचा निश्चय केला. लगेच दाक्षायणी भूतगण बरोबर घेऊन नंदीवर बसून दक्षाच्या यज्ञमंडपात आली.

यज्ञमंडपात सर्व देव आणि ऋषींना दक्षराजाने सन्मानाने बसविले होते. भवानी जगदंबा पार्वती आलेली पाहून सर्व देव आणि ऋषींना अत्यंत आनंद झाला.

नंदीवरून उतरून पार्वती पित्याजवळ गेली. दक्षराजाने तिच्याकडे बघितले नाही. जगन्माता गुणनिधान पार्वतीने आपल्या

पित्याच्या चेहऱ्याकडे पाहिले. तिला वाटले, धुराने डोळे भरले म्हणून कदाचित आपल्याकडे पित्याची दृष्टी गेली नसेल. नंतर पार्वतीने आपल्या सर्व बहिणींकडे बघितले. त्या सर्व बहिणींना राजाने सन्मानित केले होते. त्यादेखील पार्वतीशी बोलल्या नाहीत. नंतर पार्वतीने आपल्या आईकडे पाहिले. तिनेसुद्धा पार्वतीकडे बघितले नाही.

पार्वतीचे मन अगदी खट्टू झाले.

दक्ष प्रजापती तिच्याकडे बघून म्हणाला, 'ही कशाला इथे आली ? हिला इथे कोणी बोलाविले ? कन्या पार्वती आणि जामात शंकर मला दृष्टीसमोर नको !' अशा तऱ्हेने आदिमाया, प्रणवरूपिणी, अनंत ब्रह्मांडाची स्वामिनी, भवानी जगदंबा अपणदिवी पार्वती हिचा दक्षाने अपमान केला. आदिशक्ती जगदंबा दाक्षायणी पार्वती या महान अपमानामुळे अत्यंत क्रोधाने संतप्त झाली. आकाशातून प्रलय करणारी वीज धरणीवर अकस्मात पडावी त्याप्रमाणे पार्वतीने धगधगत्या यज्ञकुंडात एकदम उडी घेतली.

पुढे मग हिमालय पर्वताच्या उदरी त्रिपुरसुंदरी पार्वतीने अवतार घेतला. जगदंबिका आदिमाया प्रणवरूपिणी हिमालय पर्वताची कन्या झाली. या स्वरूपसुंदर कन्येची ब्रह्मांडात दुसरी प्रतिमा नव्हती. अष्टनायिकांच्या सौंदर्याला तिच्या पायाच्या अंगठ्याची सर येणार नव्हती. तिच्या स्वरूपाचे वर्णन करण्याची शेषालाही शक्ती नव्हती. तिच्या लावण्यात सृष्टीचे सौंदर्य प्रतिबिंबित झाले होते. तिच्या कुंकुमतिलकापुढे सूर्याचे तांबडेलाल बिंबदेखील नम्र झाले होते.



पार्वतीचा पिता हिमालय याने तिचा विवाह करण्याचे ठरविले. आपली स्वरूपसुंदर कन्या श्रीविष्णूस द्यावी असे नारदमुनीने त्याला सुचविले. हिमालयाला वाटले, विष्णू हाच आपल्या मुलीला योग्य वर आहे. त्याने ही गोष्ट पार्वतीला सांगितली. तेव्हा पार्वती म्हणाली, 'त्रैलोक्याचे अधिपती, कैलासाधिपती शंकर माझे पती व्हावेत अशी माझी इच्छा आहे. तेच माझे जन्मोजन्मीचे पती आहेत. मी दुसऱ्या कुणालाही वरणार नाही !'

'मुली, शंकराला लोक ईश्वर मानतात, हे मला ठाऊक आहे; पण तो बहुतकरून स्मशानात आढळतो. सर्वांगास राख लावितो. सर्पाचे अलंकार घालतो. मुली, दक्षप्रजापती राजाला जामात म्हणून तो आवडला नव्हता. पार्वतीने त्याच्याशी लग्न केले म्हणून त्याने तिचा आणि कैलासनाथाचा अपमान केला होता,' हिमालय उद्गारला.

'पण पिताश्री, त्याचा परिणाम काय झाला.' पार्वती उद्गारली.

'तुझ्यासारखी स्वरूपवती स्त्री त्रिभुवनात दुसरी कोणी नसेल. तुला मी श्रीविष्णूस देणार आहे ! तोच तुला योग्य वर आहे !' हिमालय म्हणाला.

'नाही. मी शिवशंकराला मनाने वरले आहे. पार्वती ही शिवाची शक्ती आहे !' असे म्हणून पार्वती आपल्या सखीला घेऊन अरण्यात निघून गेली. तिथे नदीकाठी बसून तिने वाळूचे शिवलिंग तयार केले. आपल्या सखीला बरोबर घेऊन तिने शंकराची आराधना केली. शिवलिंगाची मनोभावे पूजा केली. संपूर्ण दिवस उपोषण केले. भाद्रपद शुद्ध तृतीयेचा तो दिवस होता. पार्वतीची भक्ती पाहून शंकर बटुवेष धरून तिच्यासमोर गेले.

'हे सुंदरी, तू हे व्रत कोणत्या हेतूने केले आहेस?' यावर पार्वती म्हणाली, 'कैलासनाथ श्रीशंकर माझे पती व्हावे म्हणून मी हे व्रत केले आहे!'

ते ऐकून बटूरूप शंकर म्हणाले, 'तू तर हिमालय राजाची राजकन्या आहेस. तुला तो वर मुळीच योग्य नाही! श्रीविष्णू सर्वगुणसंपन्न आहे, त्याला तू वर! शंकराचा नाद तू सोडून दे! कारण तो महाक्रोधी आहे. वाघाचे कातडे तो परिधान करतो. सर्पाची भूषणे धारण करतो. स्मशानात वास्तव्य करतो. त्याच्या सभोवती भूतगण असतात. म्हणून तुला मी हे सांगत आहे!' हे त्या बटूचे वचन ऐकून पार्वती रागाने खवळली.

'हे शिवनिंदका, तू इथून चालता हो! तुझे तोंड मला पुन्हा दाखवू नकोस! तू ब्राह्मण आहेस म्हणून मी हे सारे ऐकून घेतले. नाहीतर तुला मी शिक्षा करणार होते!' पार्वती उद्गारली.

शिवशंकर तिचे हे उद्गार ऐकून संतुष्ट झाले व त्यांनी आपले स्वरूप प्रकट केले.

शिवशंकराला पाहताच पार्वतीने 'जयजय चंद्रमौळी' असा जयजयकार करून त्यांचे चरण दृढ धरले.

शंकर प्रसन्न होऊन तिला म्हणाले, 'पार्वती, तुला काय पाहिजे ते सत्वर माग!' ते ऐकून पार्वतीला आनंद झाला. ती म्हणाली, 'हे जगदात्म्या, जगदीश्वरा, तुझ्या अर्धांगी मला ठाव दे!'

'तथास्तु!' असे सांगून श्री शंकर कैलासास निघून गेले.

जगदंबा पार्वती आपल्या पितृसदनात गेली.

सप्तऋषींनी शिवाला हिमाचलावर पाठविले.



हिमालयाने श्री शंकराचे आदराने षोडशोपचारे पूजन केले. खरोखर शिव आणि भवानी यांचा जोडा अनुरूप असा शोभणारा आहे हे जे ब्रह्मदेवाने हिमालयाला सांगितले होते ते त्याला पटले. शिवगौरीचे त्याने लग्न लावून दिले. अशी ही पुराणकथा आहे.

'आलिका' म्हणजे सखी. 'हरिता' म्हणजे अरण्य. पार्वतीने आपल्या सखीला अरण्यात नेऊन हे व्रत केले म्हणून या व्रताला 'श्री हरितालिका व्रत' असे नाव पडले.

एकदा शिवशंकर आणि पार्वती कैलास पर्वतावर बसली होती. तेव्हा पार्वतीने शिवशंकराला विचारले, 'नाथ, सर्व व्रतांमध्ये श्रेष्ठ व्रत कोणते?' यावर शिवशंकर म्हणाले, 'सर्व व्रतांत 'श्री हरितालिका व्रत' हे सर्वश्रेष्ठ व्रत आहे. या व्रताच्या पुण्याईमुळे तुझे मानेरथ पूर्ण झाले. तू माझी स्वामिनी बनलीस!'

'तुम्ही माझे पती व्हावे हीच माझी इच्छा होती, ती पूर्ण झाली,' पार्वती म्हणाली.

'जे कोणी सखीसह पार्वतीची व शिवलिंगाची भाद्रपद शुद्ध तृतीयेला षोडशोपचारे पूजा करतील, भक्तिभावे आराधना करतील त्यांचीही इच्छा पूर्ण होईल. त्या स्त्रियांचे सौभाग्य वाढेल. त्यांचे जीवन सुखसमृद्ध होईल. त्यांना संतती, संपत्ती प्राप्त होईल!' शिवशंकर म्हणाले.

अशी ही हरितालिकेची कहाणी.

ही साठा उत्तराची कहाणी पाचा उत्तरी सुफळ संपूर्ण.

* * *

# देवीची प्रार्थना

**या देवी सर्वभूतेषु, शक्तिरूपेण संस्थिता।**
**नमस्तस्यै नमस्तस्यै नमस्तस्यै नमो नम:॥**
**त्वं परा प्रकृति: साक्षात् ब्रह्मण: परमात्मन:।**
**त्वत्तो जातं जगत्सर्वं त्वं जगज्जननी शिवे॥**
**नमो दैव्यै महादैव्यै शिवायै सततं नम:।**
**नम: प्रकृत्यै भद्रायै नियता: प्रणता: स्म ताम्॥**
**सैषाष्टौ वसव: सैषैकादश रुद्रा सैषा**
**द्वादशादित्य:। ज्ञानानां चिन्मयानंदा॥**

* * *

# श्री हरितालिका व्रत नियम

१) हे व्रत सुवासिनी आणि कुमारिका यांनी आचरावे.

२) या व्रताची देवता पार्वती ही आहे. ही देवी म्हणजेच आदिशक्ती सर्व मांगल्याचे प्रतीक आहे. हे व्रत भाद्रपद शुद्ध तृतीयेला करावयाचे असते.

३) वटसावित्री, मंगळागौरी, याप्रमाणे हरितालिका पूजा सामुदायिक रितीने करू शकता.

४) घरातील जागा स्वच्छ करावी. पूजेचा चौरंग अथवा पाट पूर्व किंवा पश्चिमाभिमुख बसता येईल अशा तऱ्हेने मांडावा. त्याखाली स्वस्तिक चिन्हांकित करावे आणि सभोवती रांगोळी काढावी.



५) चौरंग किंवा पाटावर थोडे तांदूळ घालून त्यावर मध्ये शिवलिंग, त्याच्या उजव्या बाजूला गौरी व डाव्या बाजूला सखी अशा तऱ्हेने मूर्ती ठेवाव्या. गौरीजवळ थोड्या तांदळावर गणपती म्हणून सुपारी ठेवावी. चौरंगाच्या दोन्ही बाजूला दोन बिडे ठेवावे. चौरंगाला कदली (केळी) किंवा कर्दलीचे स्तंभ बांधावे.

६) पूजेचे साहित्य तांब्याचे किंवा चांदीचे असावे. डाव्या बाजूला पूजेचा तांब्या ठेवावा.

७) पूजा करताना सर्व साहित्य जवळच आणून ठेवावे. म्हणजे मध्येच उठावे लागणार नाही.

८) नवीन साडी नेसावी. हळदकुंकू लावून घ्यावे. नथ वगैरे सौभाग्य अलंकार धारण करावे. देव, वडील मंडळी व ब्राह्मण यांना नमस्कार करून पूजेला बसावे. स्वस्थ चित्ताने पूजा करावी.

९) प्राणप्रतिष्ठेनंतर विसर्जनपूर्व उत्तरपूजा होईपर्यंत मूर्ती हलवू नये. मूर्ती मातीच्या असल्यामुळे पूजेचे उपचार हळुवारपणे करावे. मूर्तीवर फुले उडवू नये. हलकेच फुले वाहावीत. देवीवर पाणी फुलाने शिंपावे.

१०) देवाला अनामिकेने गंध लावावे. कुंकू, अक्षता उजव्या हाताची अनामिका, मधले बोट व अंगठा यांच्या चिमटीने वाहाव्यात.

११) विड्याची पाने उताणी व डेख देवीकडे करून देवीसमोर ठेवावीत. वर सुपारी ठेवावी.

१२) शेंडी देवीकडे करून नारळ ठेवावा.

१३) देवीच्या उजव्या बाजूला घंटा, डाव्या बाजूला समई आणि तुपाचा दिवा (निरांजन) उजव्या बाजूला ठेवावा. उदबत्ती

निरांजनाजवळ ठेवावी. पूजेला प्रारंभ करताना समई प्रज्वलित करावी. निरांजन पेटवावे. देवीच्या मूर्तीवर प्रकाश पाडीत उदबत्ती, निरांजन, कापूरारती ओवाळावी. डाव्या हाताने घंटानाद करावा.

१४) दुसऱ्या दिवशी सकाळी उत्तरपूजा होईपर्यंत समई पेटलेली असावी.

१५) उत्तरपूजेनंतर हरितालिकेच्या मूर्ती, देवीवर वाहिलेली फुले, पत्री समुद्रात किंवा नदीत अथवा तळ्यात विसर्जित कराव्यात.

१६) पूजेनंतर पार्वतीच्या नावाने एका सुवासिनीची खणानारळाने ओटी भरावी. तिला 'श्री हरितालिका व्रत आणि पूजा' हे पुस्तक द्यावे. इतर भगिनींना सात, अकरा, एकवीस शक्य असेल त्याप्रमाणे ही पुस्तके सप्रेम भेट म्हणून त्यावर फूल घालून द्यावीत. त्यांना नमस्कार करावा.

१७) श्री हरितालिका व्रत कथा वाचावी. त्याचा इतरांनाही लाभ घेऊ द्यावा.

१८) आरती म्हणावी. त्यानंतर देवीला महानैवेद्य दाखवावा. पूजा करणाऱ्या भगिनींनी संपूर्ण दिवस उपोषण करावे. पाणीसुद्धा पिऊ नये. रात्री जागरण करावे.

दुसऱ्या दिवशी सकाळी उत्तरपूजा करून व्रताचे पारणे करावे.

हे व्रत अत्यंत प्रभावी असून शुभकारक, लाभदायक, सौभाग्यरक्षण व सौभाग्यसंवर्धन करणारे आहे. यश, आनंद, कीर्ती, सुख, ऐश्वर्य, वैभव प्राप्त करून देणारे हे एक महान सौभाग्यव्रत आहे.

आपल्या पतीचे प्रेम कायम राहावे, आपले पती आरोग्यवान, आयुष्यवान बनावे, म्हणून पतिव्रता हे व्रत मोठ्या निष्ठेने, भक्तिभावाने,



अत्यंत उत्साहाने प्राचीन काळापासून करीत आल्या आहेत. त्यांना या व्रताचे फळ मिळाले, आपणालाही तसे फळ मिळेल.

* * *

# श्री हरितालिका - पूजासाहित्य

१) हरितालिकेच्या मूर्ती (दोन) व शिवलिंग.

२) पाण्याने भरलेला तांब्या, ताम्हन, पळी भांडे.

३) पूजेच्या ताटात गंध, अक्षता, फुले, विड्याची पाने, १० सुपाऱ्या.

४) दूध, दही, तूप, मध, साखर, गूळ निरनिराळ्या कचोळ्यांत घ्यावे.

५) दूर्वा, बेल, तुळस, कापसाची वस्त्रे, जानवे, कापूर, उदबत्ती, निरांजन, काडवाती, अत्तर, कढत पाणी, हळद, पिंजर, काजळ, शेंदूर, बांगड्या, करंडा, फणी, मणिमंगलसूत्र, पूजेतील पत्री.

६) शहाळे, केळी, पाच प्रकारची फळे.

७) २ नारळ, एक पूजेकरिता. दुसरा सौभाग्यवायनाकरिता.

८) या पुस्तकावरून पूजा स्वत:च करावी. नंतर ब्राह्मण गुरुजींना शिधा आणि दक्षिणा नेऊन द्यावी.

नवविवाहित भगिनींनी हे श्री हरितालिका व्रत अवश्य करावे. या व्रताने आदिमाया पार्वती संतुष्ट होऊन तुमचे सर्व मनोरथ पूर्ण होतील. संसार सुखाचा होईल. विधिपूर्वक परम श्रद्धेने, भक्तिभावाने हे व्रत करून आनंदी, सुखी व्हावे.

शिव व पार्वती आपणावर प्रसन्न होवोत. * * *

# श्री हरितालिका - पूजाविधी

तांब्यातील पाणी भांड्यात ओतून घ्यावे. पळीने पाणी उजव्या हातावर घेऊन आचमन करावे. नंतर ताम्हनात सोडावे व म्हणावे -

**ॐ केशवाय नमः। ॐ नारायणाय नमः। ॐ माधवाय नमः।**

उजवा हात धुऊन, हात जोडून म्हणावे.

**ॐ गोविंदाय नमः। ॐ विष्णवे नमः। ॐ मधुसूदनाय नमः। ॐ त्रिविक्रमाय नमः। ॐ वामनाय नमः। ॐ श्रीधराय नमः। ॐ हृषिकेशाय नमः। ॐ पद्मनाभाय नमः। ॐ दामोदराय नमः। ॐ संकर्षणाय नमः। ॐ वासुदेवाय नमः। ॐ प्रद्युम्नाय नमः। ॐ अनिरुद्धाय नमः। ॐ पुरुषोत्तमाय नमः। ॐ अधोक्षजाय नमः। ॐ नारसिंहाय नमः। ॐ अच्युताय नमः। ॐ जनार्दनाय नमः। ॐ उपेन्द्राय नमः। ॐ हरये नमः। ॐ श्रीकृष्णाय नमः।**

हातात अक्षता घेऊन हात जोडावे व म्हणावे -

**श्रीमन्महागणाधिपतये नमः। इष्टदेवाताभ्यो नमः। कुलदेवताभ्यो नमः। ग्रामदेवताभ्यो नमः। वास्तुदेवताभ्यो नमः। मातृपितृभ्यां नमः। उमामहेश्वराभ्यां नमः। सर्वेभ्यो देवेभ्यो नमः। सर्वेभ्यो ब्राह्मणेभ्यो नमः। प्रधान देवताभ्यो नमः। अविघ्नमस्तु॥ सर्वमंगलभांगल्ये शिवे सर्वार्थसाधिके। शरण्ये त्र्यम्बके गौरि नारायणि नमोऽस्तु ते॥**



## संकल्प :

हातात अक्षता घ्याव्या. म्हणावे -

**अद्य विष्ण्वात्मक तिथ्यादौ पुराणोक्त फलप्राप्त्यर्थ श्रीपरमेश्वरप्रीत्यर्थ हरितालिकादेवी प्रसादेन मम इह जन्मनि पापक्षय पूर्वक अखंडित सौभाग्य पुत्र पौत्र धन धान्यादि विविधैश्वर्य प्राप्त्यर्थ उमामहेश्वर देवता प्रीत्यर्थ प्रतिवार्षिक विहितं हरितालिका व्रतांगत्वेन यथाज्ञानेन यथामीलितोपचारैः उमामहेश्वर पूजनमहं करिष्ये।**

अक्षतांसह ताम्हनात पळीने पाणी सोडावे.

उजव्या बाजूला जी सुपारी गणपती समजून ठेवली आहे, त्याची पूजा करावी. हात जोडून म्हणावे -

**वक्रतुण्ड महाकाय सूर्यकोटिसमप्रभ।**
**निर्विघ्नं कुरु मे देव सर्वकार्येषु सर्वदा॥**

नमस्कार करावा.

**श्री महागणपतये नमः सर्वोपचारार्थे गंधाक्षतपुष्पं समर्पयामि।**

गंध, अक्षता, फुले वाहावी. गूळ, खोबरे याचा नैवेद्य दाखवावा. विड्यावर एक नाणे ठेवून त्यावर पळीने पाणी सोडावे.

तांब्याला गंध, अक्षता, फूल लावावे.

**कलशदेवताभ्यो नमः सर्वोपचारार्थे गंधाक्षतपुष्पं समर्पयामि।**

समईवर गंधाक्षत फूल ठेवावे.

**दीपदेवताभ्यो नमः समस्तोपचारार्थे गंधाक्षतपुष्पं समर्पयामि।**

पूजासाहित्यावर व आपल्या अंगावर तुळशीपत्राने कलशातील पाणी शिंपावे.

**अपवित्रः पवित्रो वा सर्वावस्था गतोऽपि वा।**
**यः स्मरेत्पुंडरीकाक्षं सबाह्याभ्यंतर शुचिः॥**

* * *

# हरितालिका पूजन

हातात अक्षता घेऊन सखीसह पार्वतीचे व शिवाचे ध्यान करावे. म्हणावे -

**पीत कौशेयवसनां हेमाभां कमलासनाम्।**
**भक्तानां वरदां नित्यं पार्वती चिंतयाम्यहम्॥**
**विधाय वालुकालिंगमर्चयन्तीं महेश्वरम्।**
**पूर्णेन्दुवदनां ध्यायेद्धरितालीं वरप्रदाम्॥**
**मंदारमालाकुलितालकायै।**
**कपालमालांकितशेखराय।**
**दिव्यांबरायै च दिगंबराय।**
**नमः शिवायै च नमः शिवाय॥**
**नमो देव्यै महादैव्यै शिवायै सततं नमः।**



**नमः प्रकृत्यै भद्रायै नियताः प्रणताः स्म ताम्।**
**श्रीसखीसहित उमामहेश्वराभ्यां नमः। ध्यायामि॥**

देवीच्या पायाशी अक्षता वाहाव्या आणि म्हणावे -

**देवि देवि समागच्छ प्रार्थयेहं जगन्मये।**
**इमां मया कृतां पूजां गृहाण सुरसत्तमे॥**
**श्रीसखीसहित उमामहेश्वराभ्यां नमः।**
**आवाहनार्थे अक्षतान् समर्पयामि॥**

पुन्हा अक्षता वाहाव्या, म्हणावे -

**भवानि त्वं महादेवि, सर्व सौभाग्यदायके।**
**अनेकरत्नसंयुक्तं आसनं प्रतिगृह्यताम्॥**
**श्री सखीसहित उमामहेश्वराभ्यां नमः।**
**आसनार्थे अक्षतान् समर्पयामि॥**

देवीच्या चरणावर फुलाने पाणी शिंपावे. म्हणावे -

**सुचारु शीतलं दिव्य नानागंध समन्वितम्।**
**पाद्यं गृहाण देवेशि महादेवि नमोस्तु ते॥**
**श्री सखीसहित उमामहेश्वराभ्यां नमः।**
**पादयोः पाद्यं समर्पयामि॥**

पळीत गंध, फूल, नाणे, सुपारी, घेऊन ते पाणी देवीच्या चरणी थोडे वाहून ताम्हनात सोडावे. म्हणावे -

**श्रीपार्वती महाभागे शंकरप्रियवादिनी।**
**अर्घ्यं गृहाण कल्याणि भर्त्रासह पतिव्रते॥**

**श्री सखीसहित उमामहेश्वराभ्यां नमः।**
**अर्घ्यं समर्पयामि॥**

पुन्हा देवीच्या चरणी फुलाने पाणी शिंपावे व म्हणावे -

**गंगाजलं समानीतं सुवर्णकलशे स्थितम्।**
**आचम्यतां महाभागे रुद्रेणसहितेऽनघे।**
**श्री सखीसहित उमामहेश्वराभ्यां नमः।**
**आचमनीयं समर्पयामि॥**

स्नानाकरिता पुन्हा पाणी देवीच्या चरणी शिंपावे व म्हणावे -

**गंगा सरस्वती रेवा पयोष्णी नर्मदाजलैः।**
**स्नापितासि मया देवि तथा शांति कुरुष्व मे॥**
**श्री सखीसहित उमामहेश्वराभ्यां नमः।**
**स्नानं समर्पयामि॥**

फुलाने थोडे दूध, दही, तूप, मध, साखर हे देवीच्या चरणी वाहून अक्षता घालाव्या व मंत्र म्हणावा -

**पयो दधि घृतं चैव मधु शर्करयामुतम।**
**पंचामृतेन स्नपनं क्रियतां परमेश्वरि॥**
**श्री सखीसहित उमामहेश्वरराभ्यां नभः।**
**पंचामृतस्नानं समर्पयामि॥**
**शुद्धोदकस्नानं समर्पयामि।**
**सकलपूजार्थे अक्षतान् समर्पयामि॥**



**श्री सखीसहित उमामहेश्वराभ्यां नमः।**
**गंधोदकस्नानं समर्पयामि॥**

पळीत गंध घालून ते देवीच्या चरणी वाहावे. नंतर अक्षता वाहाव्या.

फुलाने देवीला अत्तर लावून कढत पाणी फुलाने शिंपावे. नंतर दुसरे पाणी व अक्षता वाहाव्या.

**अंगोद्वर्तनकं देव कस्तूर्यादि विमिश्रितम्।**
**स्नानार्थ ते प्रयच्छामि स्वीकुरुष्व महेश्वरि॥**
**श्रीसखीसहित उमामहेश्वराभ्यां नमः।**
**उष्णोदकस्नानं समर्पयामि।**
**शुद्धोदकस्नानं समर्पयामि।**
**सकलपूजार्थे अक्षतान् समर्पयामि।**

गंध, अक्षता, फुले वाहावी. म्हणावे -

**गंधाक्षतपुष्पं समर्पयामि।**

हळद, कुंकू वाहावे. म्हणावे -

**हरिद्राकुंकुमं सौभाग्यद्रव्याणि समर्पयामि।**

उदबत्ती ओवाळावी. म्हणावे -

**धूपं समर्पयामि।**

दीप ओवाळावा. म्हणावे -

**दीपं समर्पयामि।**

दुधाचा नैवेद्य दाखवावा. म्हणावे -

**नैवेद्यार्थे पयोनैवेद्यं समर्पयामि॥**

फूल वाहावे. म्हणावे -

**मंत्रपुष्पं समर्पयामि।**

**अनेन कृतपंचोपचारपूजनेन श्री उमामहेश्वरौ प्रीयेताम्।**

ताम्हनात पळीभर पाणी हातावरून सोडावे.

पंचामृताचा नैवेद्य दाखवावा. म्हणावे -

**नैवेद्यार्थे पंचामृतशेषनैवेद्यं समर्पयामि।**

एक विडा घेऊन त्यावर नाणे, सुपारी ठेवून पाणी पळीने सोडावे. देवीवर गंधफूल वाहावे. म्हणावे -

**श्री सखीसहित उमामहेश्वराभ्यां नमः। मुखवासार्थे पूगीफलतांबूल समर्पयामि। सुवर्णपुष्पदक्षिणां समर्पयामि। मंत्रपुष्प समर्पयामि। नमस्करोमि।**

**अनेन पूर्वाराधनेन।**

**श्री सखीसहित उमामहेश्वरौ प्रीयेताम्।**

नंतर फुलाने देवीवर पाणी शिंपून अभिषेक करावा.

**अमृताभिषेकोस्तु। शान्तिः। पुष्टिस्तुष्टि उचास्तु।**

**श्री सखीसहित उमामहेश्वराभ्यां नमः।**

**अभिषेक स्नानांतरेण आचमनीयं समर्पयामि॥**

तीन वेळा देवीवर पाणी फुलाने शिंपावे.

**काश्मीरागरु कस्तुरीकर्पूरमलयान्वितं।**

**उद्वर्तनं मया दत्तं स्नानार्थ प्रतिगृह्यताम्॥**



देवीला सुवासिक तेल लावावे आणि पुन्हा फुलाने पाणी शिंपावे. नंतर कापसाचे वस्त्र वाहावे. म्हणावे -

**वस्त्रं च सोमदैवत्यं लज्जायास्तु निवारणम्।**

**मया निवेदितं भक्त्या गृहाण परमेश्वरि।**

**श्री सखीसहित उमामहेश्वराभ्यां नमः।**

**वस्त्रार्थे कार्पासवस्त्रं समर्पयामि॥**

शंकराला जानवे वाहावे व म्हणावे -

**मंत्रमयं मयां दत्तं परब्रह्ममयं शुभम्।**

**उपवीतमिदं सूत्रं गृहाण परमेश्वर॥**

**शिवाय नमः। उपवस्त्रार्थ यज्ञोपवीतं समर्पयामि॥**

देवीला गंध वाहावे.

**श्रीखण्डं चंदनं दिव्यं गंधाढ्यं सुमनोहरम्।**

**विलेपनं सुर श्रेष्ठे चंदनं प्रतिगृह्यताम्॥**

**श्री सखीसहित उमामहेश्वराभ्यां नमः।**

**विलेपनार्थे चंदनं समर्पयामि॥**

नंतर हळदकुंकू, शेंदूर, बांगड्या, गळेसर, काजळ वगैरे सर्व सौभाग्य अलंकार वाहावे.

**हरिद्रा कुंकुमं चैव सिंदूरं कज्जलान्वितम्।**

**सौभाग्यद्रव्यसंयुक्तं गृहाण परमेश्वरि॥**

**श्री सखीसहित उमामहेश्वराभ्यां नमः।**

**हरिद्राकुंकुमादि सौभाग्यद्रव्याणि समर्पयामि।**

निरनिराळी फुले वाहावी व म्हणावे -

**माल्यादीनि सुगंधीनि मालत्यादीनि वै शिवे।**
**मयाँ हतानि पुष्पाणि गृह्यतां परमेश्वरि॥**
**श्री सखीसहित उमामहेश्वराभ्यां नम:।**
**पूजार्थं यथालाभपुष्पाणि समर्पयामि।**

अंगपूजा करताना अक्षता घेऊन त्या त्या अवयवावर वाहाव्या. म्हणावे -

**उमायै नम: पादौ पूजयामि। (पायावर)**
**गौर्यै नम: गुल्फौ पूजयामि। (पायाचा घोटा)**
**पार्वत्यै नम: जानुनी पूजयामि। (ढोपरावर)**
**जगद्धात्र्यै नम:। ऊरु पूजयामि। (मांड्या)**
**जगत्प्रतिष्ठायै नम:। कटीं पूजयामि। (कंबर)**
**शक्तिदायै नम:। जंघे पूजयामि। (जांघा)**
**शांतिरूपिण्यै नम:। नाभि पूजयामि। (बेंबी)**
**देव्यै नम:। उदरं पूजयामि। (पोट)**
**लोकवंद्यायै नम:। स्तनौ पूजयामि। (स्तन)**
**काल्यै नम:। कंठं पूजयामि। (कंठ)**
**शिवायै नम:। मुखं पूजयामि। (मुख)**
**भवान्यै नम:। नेत्रे पूजयामि। (डोळे)**
**रुद्राण्यै नम:। कर्णौ पूजयामि। (कान)**
**महादेव्यै नम:। ललाटं पूजयामि। (कपाळ)**



**मंगलदात्र्यै नम:। शिरं पूजयामि। (मस्तक)**
**पुत्रदायिन्यै नम:। सर्वांगं पूजयामि।**

देवीवर अक्षता आणि फुले वाहावी. नमस्कार करावा. नंतर पत्री वाहावी.

**उमायै नम:। बिल्वपत्रं समर्पयामि। (बेल)**
**गौर्यै नम:। अपामार्गपत्रं समर्पयामि। (आघाडा)**
**पार्वत्यै नम:। मालतीपत्रं समर्पयामि। (मालतीपत्र)**
**दुर्गायै नम:। दुर्वा समर्पयामि। (दूर्वा)**
**काल्यै नम:। चंपकपत्रं समर्पयामि। (चाफा)**
**भवान्यै नम:। करवीरपत्रं समर्पयामि। (कण्हेरी)**
**रुद्राण्यै नम:। बदरीपत्रं समर्पयामि। (बोरी)**
**शर्वाण्यै नम:। अर्कपत्रं समर्पयामि। (रुई)**
**चंडिकायै नम:। तुलसीपत्रं समर्पयामि। (तुळस)**
**शिवायै नम:। दाडिमीपत्रं समर्पयामि। (डाळिंब)**
**अपर्णायै नम:। धत्तूरपत्रं समर्पयामि। (धोत्रा)**
**गिरिजायै नम:। बकुलपत्रं समर्पयामि। (बकुळ)**
**अंबिकायै नम:। अशोकपत्रं समर्पयामि। (अशोक)**
**सर्वेश्वर्यै नम:। नानाविधपत्राणि समर्पयामि।** (इतर पत्री)

देवीची नावे घेऊन फुले वाहावी व नमस्कार करावा.

**उमायै नम:। गौर्यै नम:।**
**हिमवत्यै नम:। भवान्यै नम:।**

रुद्राण्यै नमः। सर्वमंगलायै नमः।
अपर्णायै नमः। पार्वत्यै नमः।
दुर्गायै नमः। भगवत्यै नमः।
सरस्वत्यै नमः। शारदायै नमः।
वागीश्वर्यै नमः। चण्डिकायै नमः।
गिरिजायै नमः। ललितायै नमः।
शक्तिदायै नमः। शांतिरूपिण्यै नमः।
महादेव्यै नमः। मंगलदात्र्यै नमः।
पुत्रदायिन्यै नमः। सर्वेश्वर्यै नमः।
महाश्वर्यै नमः। गंगायै नमः।
कात्यायन्यै नमः। काल्यै नमः।
शिवायै नमः। मृडान्यै नमः।
चामुण्डायै नमः। कौमार्यै नमः।
अम्बिकायै नमः। आर्यायै नमः।
दाक्षायण्यै नमः। मेनकात्मजायै नमः।
पद्मिन्यै नमः। पद्माकरवासिन्यै नमः।
महिषमर्दिन्यै नमः। सिंहवाहिन्यै नमः।
जगद्धात्र्यै नमः। जगत्प्रतिष्ठायै नमः।
देव्यै नमः। लोकवंद्यायै नमः।
शर्वाण्यै नमः। शाम्भव्यै नमः।



शूलपाणयै नमः। पशुपतिप्रियायै नमः।
महालावण्यै नमः।
सच्चिदानंदरूपिण्यै नमः।
त्रिपुरांतकायै नमः। कपर्दिन्यै नमः।
कपालधारिण्यै नमः।
धनदायै नमः। मेरुमंदारवासिन्यै नमः।
बुद्धिप्रियायै नमः।

नंतर उदबत्ती ओवाळावी म्हणावे -

वनस्पतिरसोद्भूतो गंधाढ्यो गंधउत्तमः।
आघ्रेयः सर्वदेवानां धूपोयं प्रतिगृह्यताम्॥
श्रीसखीसहित उमामहेश्वराभ्यां नमः। धूपं समर्पयामि॥

तुपाचे निरांजन ओवाळावे. म्हणावे -

आज्यं चं वर्तिसंयुक्तं वन्हिना योजितं मया।
दीपं गृहाण गिरिजे ममाज्ञानं निवारम्।
श्री सखीसहित उमामहेश्वराभ्यां नमः।
दीपं समर्पयामि॥

देवीपुढे पाण्याने चौकोनी मंडल करून नैवेद्याकरिता जे काही पदार्थ आणले असतील ते त्यावर ठेवावे.

अन्न चतुर्विधं चारू रसैः षड्भिः समन्वितम्।
भक्ष्यभोज्यसमायुक्तं नैवेद्यं प्रतिगृह्यताम्॥

**श्री सखीसहित उमामहेश्वराभ्यां नमः।**
**नैवेद्यार्थे नानाखाद्यनैवेद्यं समर्पयामि॥**
(पळीने पाणी सोडणे.)
**प्राणाय नमः। अपानाय नमः।**
**व्यानाय नमः। उदानाय नमः।**
**समानाय नमः। ब्रह्मणे नमः।**
उजव्या हातावरून पळीने ताम्हनात पाणी सोडावे.
**नैवेद्यमध्ये पानीयं समर्पयामि।**
**उत्तरापोशनं हस्तमुखप्रक्षालनं समर्पयामि।**
फुलाला गंध लावून ते फूल वाहावे.
**करोद्वर्तनार्थे चंदनं समर्पयामि।**
देवीपुढे विडा ठेवून त्यावर पळीने पाणी सोडावे.
**पूगीफलं महद्दिव्यं नागवल्लीदलैर्युतम।**
**कर्पूरैलासमायुक्तं ताम्बूलं प्रतिगृह्यताम्॥**
**श्री सखीसहित उमामहेश्वराभ्यां नमः।**
**मुखवासार्थे पूगीफलताम्बूल समर्पयामि॥**
देवीपुढे महादक्षिणा ठेवावी. त्यावर पळीने पाणी सोडावे. म्हणावे -
**श्री सखीसहित उमामहेश्वराभ्यां नमः।**
**सुवर्णपुष्पदक्षिणां समर्पयामि॥**
देवीपुढे नारळ, केळी वगैरे इतर फळे ठेवून त्यावर पळीने पाणी सोडावे.



**इदं फलं मया देव स्थापितं पुरतस्तव।**
**तेन मे सुफलावाप्तिर्भवेत जन्मनि जन्मनि॥**
**हिरण्यगर्भगर्भस्थं हेमबीजं विभावसोः।**
**अनन्तपुण्यफलदमतः शान्ति प्रयच्छ मे॥**
एका विड्यावर फळे व दक्षिणा ठेवून समर्पण करावी. नंतर काडवाती लावाव्या. निरांजन ओवाळावे.
**चंद्रादित्यौ धरणिर्विद्युदाग्निस्तथैव च।**
**त्वमेव सर्वज्योतींषि आर्तिक्यं प्रतिगृह्यताम्॥**
**श्री सखीसहित उमामहेश्वराभ्यां नमः।**
**महानीरांजनदीपं समर्पयामि।**
आरती म्हणावी.
नंतर हातात फुले घेऊन देवीच्या चरणी वाहावी. नमस्कार करावा. म्हणावे -
**नमो देव्यै महादेव्यै शिवायै सततं नमः।**
**नमः प्रकृत्यै भद्रायै नियताः प्रणताः स्म ताम्॥**
प्रदक्षिणा घालावी. म्हणावे.
**यानि कानि च पापानि जन्मान्तरकृतानि च।**
**तानि तानि विनश्यंति प्रदक्षिण पदे पदे॥**
**श्री सखीसहित उमामहेश्वराभ्यां नमः।**
**प्रदक्षिणां समर्पयामि॥**

**नमः सर्वहितार्थाय जगदाधारहेतवे।**
**उमाकान्ताय शान्ताय शंकराय नमो नमः॥**

नमस्कार करावा. फुले वाहावी.

**शिवायै हरकान्तायै प्रकृत्यै सृष्टिहेतवे।**
**शिवरूपे नमस्तुभ्यं गृहाण कुसुमांजलिम्॥**
**श्री सखीसहित उमामहेश्वराभ्यां नमः।**
**मंत्रपुष्पांजलि समर्पयामि॥**

देवीला हात जोडून प्रार्थना करावी. म्हणावे -

**यथा त्वं देवदेवेशि सौभाग्यादि समान्विता।**
**तथा मां कुरु देवेशि जन्मजन्मनि पार्वति॥१॥**
**त्वयि भक्ति च मे देहि भृशं भर्तरि शंकरे।**
**संसारहारिणी बुद्धि अंते देहि नमोस्तु ते॥२॥**
**आवाहनं न जानामि न जानामि तवार्चनम्।**
**पूजा चैव न जानामि क्षम्यतां परमेश्वरि॥३॥**
**रूपं देहि जयं देहि यशो देहि द्विषो जहि।**
**पुत्रान् देहि धनं देहि सर्वान्कामांश्च देहि मे॥४॥**
**मंत्रहीनं क्रियाहीनं भक्तिहीनं सुरेश्वरि।**
**यत्पूजितं मया देवि परिपूर्ण तदस्तु मे॥५॥**

ताम्हनात पळीने पाणी सोडावे. म्हणावे -

**अनेन यथाज्ञानेन यथामीलितोपचारैः कृतपूजनेन।**
**श्री सखीसहित उमामहेश्वरौ प्रीयेताम्। न मम॥**



एका पळीत पाणी घेऊन त्यात गंध, अक्षता, पुष्प, द्रव्य, सुपारी घेऊन प्रत्येक श्लोकानंतर एक एक अर्घ्य ताम्हनात द्यावे. अशी तीन अर्घ्ये द्यावी.

**१) सर्वसंपत्प्रदे देवि सर्वकामप्रदायिनी।**
**उमे सर्वार्थदे देविं गृहाणार्घ्य नमोस्तु ते॥**
**श्रीसखीसहित उमामहेश्वराभ्यां नमः।**
**इदमर्घ्यं समर्पयामि॥**

**२) कस्तुरीकुंकुमोपेतं कर्पूरं चन्दनं सह।**
**गंधपुष्पाक्षतैर्युतं गृहाणार्घ्य नमोस्तु ते॥**
**श्री सखीसहित उमामहेश्वराभ्यां नमः।**
**इदमर्घ्यं समर्पयामि॥**

**३) अवैधव्यं च सौभाग्यं देहि त्वं मम सुव्रते।**
**पुत्रान्पौत्रांश्च सौख्यं च गृहाणार्घ्य नमोस्तु ते॥**
**श्री सखीसहित उमामहेश्वराभ्यां नमः।**
**इदमर्घ्य समर्पयामि॥**

**अनेन यथाज्ञानेन कृतपूजेनन श्री उमामहेश्वरौ प्रीयेताम्। न मम॥**

नंतर ब्राह्मणाची पूजा करून त्याला दक्षिणा द्यावी किंवा पूजेच्या सांगतेकरिता दक्षिणा व वायन यांचे पाणी सोडून मागाहून ते ब्राह्मणाला द्यावे.

For Hariom Astrologers
Proprietor

कृतस्य हरितालिका व्रतांगपूजासांगतासिद्ध्यर्थ तत्संपूर्ण फलप्राप्त्यर्थ ब्राह्मणाय दक्षिणाप्रदानं वायनदानं च करिष्ये।

असे म्हणून पाणी सोडावे.

✻ ✻ ✻

## उत्तरपूजा

दुसऱ्या दिवशी सकाळीच स्नान करून गंध, पुष्प, अक्षता वाहाव्या. दहीभाताचा, लाडू वगैरे एखाद्या गोड पदार्थाचा नैवेद्य दाखवावा. आरती म्हणावी. नमस्कार करावा. देवीकडे मागणे मागावे. देवांना निरोप द्यावा. नंतर त्या मूर्तीचे विसर्जन करावे.

✻ ✻ ✻

## श्री हरितालिकेची आरती

जय देवी हरितालिके॥ सखी पार्वती अंबिके॥
आरती ओवाळीते॥ ज्ञानदीपकळिके॥ धृ०॥
हर अर्धांगी वससी। जासी यज्ञ माहेरासी।
तेथे अपमान पावसी। यज्ञकुंडी गुप्त होसी॥ जय०॥ १॥
रिघसी हिमाद्रीच्या पोटीं। कन्या होसी तूं गोमटी॥
उग्र तपश्चर्या मोठी॥ आचरसी उठाउठी॥ जय०॥ २॥



तपपंचाग्निसाधनें। धूम्रपानें अधोवदनें॥
केली बहू उपोषणें। शंभु भ्रताराकारणे॥ जय०॥ ३॥
लीला दाखविसी दृष्टी। व्रत करिसी लोकांसाठी॥
पुन्हा वरिसी धूर्जटी। मज रक्षावे संकटी॥ जय०॥ ४॥
काय वर्णू तव गुण। अल्पमति नारायण॥
माते दाखवी चरण॥ चुकवावे जन्ममरण॥
जय देवी हरितालिके॥ सखी पार्वती अंबिके॥
आरती ओवाळीते॥ ज्ञानदीपकळिके॥ ५॥

✻ ✻ ✻

## देवीकडे मागणे

पार्वतीने हे व्रत स्वत:साठीच नव्हे तर जगाच्या कल्याणासाठी केले. भक्तियुक्त श्रद्धेने मनोभावे हे व्रत करून आपणही देवीकडे प्रार्थना करा. हे माते, तू आमचे कल्याण कर. आमचे मनोरथ पूर्ण कर. आम्हांला सर्व सुखे प्राप्त करून दे. तुझे हे व्रत करणाऱ्यांच्या जीवनात सुखसमृद्धी, ऐश्वर्य-वैभव आण. जे निर्धन असतील त्यांना धन दे. नि:संतान असतील त्यांना संतान दे. सुवासिनींना अखंड सौभाग्य प्राप्त होऊ दे. विवाहेच्छू कुमारिकांचे विवाह जुळून त्यांना मनाजोगता पती मिळू दे. सर्वांच्या इच्छा पूर्ण कर, सर्वांना आनंदी, सुखी कर. सर्वांच्या घरात सुख, शांती नांदू दे. माते, तुझ्याकडे हेच आमचे मागणे आहे.

✻ ✻ ✻

# देवीची स्तुती

पार्वती ही शिवाच्या हृदयातील शोभा आहे. शंकर हेच आपणाला पती मिळावे म्हणून तपश्चर्या करणारी ही हिमनगदुहिता आदिशक्ती आहे. सर्वैश्वर्यसंपन्न सौभाग्यलक्ष्मी आहे. भक्तवत्सला आहे. नितांत वत्सल भावनेने ती भक्तांचे कल्याण करते.

राम आणि लक्ष्मण जनकाच्या पुष्पवाटिकेत फुले गोळा करावयास गेले असता रामाला पाहून सीता त्याच्यावर अनुरक्त होते. ती आपले मनोरथ सफल व्हावे म्हणून गौरीच्या मंदिरात जाऊन विनवणी करते. 'गौरी, गिरिजा भवानी ही जगज्जननी आहे. अनादी अनंत आहे. वेदही तिचा अमित प्रभाव पूर्णतः जाणू शकले नाहीत. शेष भगवानही तिचा महिमा वर्णू शकत नाहीत. तिची सेवा केली म्हणजे चारी पुरुषार्थ सहज सुलभ होतात. देव, मुनी, मानव तिचे पूजन करून सुखी होतात.' सीतेने गिरिजा भवानीचा असा महिमा गायिला. देवीने सीतेला आशीर्वाद दिला. तुलसीदासांनी 'रामचरित मानस' या ग्रंथात ह्या प्रसंग रंगविला आहे.

सर्व मंगल वस्तूंतील मंगलरूप देवी कल्याणकारिणी, शरणागताचे रक्षण करणारी गौरी, जगज्जननी, आदिशक्ती, पार्वती तुला नमस्कार असो.

॥ॐ शांतिः शांतिः शांतिः सुखशांतिर्भवतु॥

✽ ✽ ✽

आमच्या येथे सर्व प्रकारची धार्मिक, आध्यात्मिक, ज्योतिष व शालेय पुस्तके तसेच नविन वर्षाच्या दिनदर्शिका व डायऱ्या होलसेल व किरकोळ दराने मिळतील.

# तुकाराम बुक डेपो

१७/ सी.पी.टँक रोड, गिरगांव, मुंबई - ४०० ००४.
दुरध्वनी : २२४२१६८९/ २२४०५७९८

Astro • Puja • Vastu

# FALIT JYOTISH AND VASTU SHASTRA CONSULTANT

## FOR ALL DHARMIK POOJA'S

SHRI GANESH PUJA

SHRI SATYANARAYAN PUJA

VASTU SHANTI

WEDDING | SAKHARPUDA | MUNJ

JANANA SHANTI | RUDRABHISHEK

SAPTASHATI PATH | HAVAN | ETC.

## HARI OM DHARMIK PUJA VIDHI KENDRA

**SANPADA OFFICE**
Office No. 8, 1st Floor, Shiva Triveni Galleria CHS., Plot No. 13, Sector 8, Sanpada, Navi Mumbai - 400705.

**GOVANDI OFFICE**
Shri Swaybhu Hanuman Mandir, Deonar Mahanagarpalika Vasahat, Govandi, Mumbai - 400043.

hariom astrologers
hariom astrologers
hariom_astrologers
hariomastrologers@gmail.com
www.hariomastrologers.com